
## वाढदिवस


डॉ. मुकुंद महाजन
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, लेखक


वि. वि. करमरकर
ज्येष्ठ क्रीडा समीक्षक


बंडा जोशी
एकपात्री कलाकार

यशपाल शर्मा
माजी क्रिकेटपटू

प्रमोद कांबळे
शिल्पकार

वीरेंद्र जगताप
आमदार

शंकर जाधव
चिंतन ग्रुप

सुनील शिंदे
माजी आमदार

सुनील शेट्टी
अभिनेता

## विचार

महान काम करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तुम्ही जे काम करत आहात. त्यावर निरतिशय प्रेम करा.

- स्टीव्ह जॉब्ज

## पंचांग

मंगळवार, ११ ऑगस्ट २०१५

निज आषाढ कृष्ण द्वादशी, शके १९३७; द्वादशी समाप्ती सायं. ४.४५; भारतीय सौर श्रावण २०, शके १९३७; चंद्रराशी : मिथुन; नक्षत्र : आर्द्रा (पर्यंत, नंतर पुनर्वसू); सूर्योदय : स. ६.१५; सूर्यास्त : सायं. ७.०४; चंद्रोदय : पहाटे ३.१५; चंद्रास्त : सायं. ४.३२

## राशिभविष्य

**मेष :** गाठीभेटीचे योग येतील.
**वृषभ :** मोठ्यांचा सल्ला घ्या.
**मिथुन :** उत्साह वृद्धिंगत होईल.
**कर्क :** मनाप्रमाणे कामे शक्य नाही.
**सिंह :** अडथळ्यातून मार्ग काढाल.
**कन्या :** प्रयत्नांनीच यश मिळेल.
**तूळ :** लहान कुरबुरी राहतील.
**वृश्चिक :** कौटुंबिक वातावरण चांगले.
**धनु :** आरोग्याकडे लक्ष द्या.
**मकर :** मुलांकडून प्रतिसाद मिळेल.
**कुंभ :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या.
**मीन :** मित्रांच्या भेटी संभवतात.

BHAVISHYA.MAHARASHTRATIMES.COM

## जीके वाढवा

१. जपानवरील अणुबॉम्ब हल्ल्याला नुकतीच किती वर्षे पूर्ण झाली?
२. आर्थिक विषयाशी संबंधित सीबीडीटीचे पूर्ण रूप काय?
३. कय्यरा किन्हन्ना राय हे कोणत्या भाषेतील कवी होते?
४. खाद्यतेलांचा सर्वात मोठा ग्राहक देश कोणता?
५. आंतरराष्ट्रीय युवा दिन कधी असतो?

**उत्तरे : १. ७० वर्षे, २. सेंट्रल बोर्ड ऑफ डिरेक्ट टॅक्सेस, ३. कन्नड, ४. भारत, ५. ऑगस्ट १२**

## मटा कौल

कालचा प्रश्न :
**बिहारमधील राज्यपालांची नियुक्ती ही भविष्यातील राजकीय समीकरणे डोळ्यासमोर ठेवूनच झाली आहे, असे वाटते का?**

७६ २४

आजचा प्रश्न :
**बोगस डॉक्टरांवर कारवाई झाल्यास सर्व शहरांत फुटलेले हे पेव रोखण्यात यश येईल, असे वाटते काय?**

## पुस्तक विश्व

### अतर्क्य



चमत्कार, रहस्य यांची सरमिसळ असलेल्या या संदीप दांडेकर यांच्या कथा आहे. एकूण १३ कथांचा हा संग्रह अतर्क्य मांडून वाचकांची भयकथांची भूक भागवतो. मात्र, या कथा लिहिताना लेखकाने विज्ञान, मानसशास्त्र, इतिहासाची अभ्यास केला आहे. 'आपल्या नेहमीच्या तोचतोचपणा असलेल्या आयुष्यात घडू न शकणाऱ्या घटनांना जर एखाद्या कथेत गुंफता आलं तर त्यातून निखळ मनोरंजन मिळू शकतं,' हा कथालेखनामागचा उद्देश ते सांगतात. त्याच वेळी 'कथांमधील चमत्कारांमागे अंधश्रद्धांना खतपाणी घालण्याचा सहेतुक किंवा अहेतुक प्रयत्न नाही,' असेही ते प्रांजळपणे सांगतात. स्वप्नांमध्ये दिसणारे अशक्य कोटीतील खेळ या कथांमधून जिवंत होतात.

हे पुस्तक BookGanga.com वर उपलब्ध आहे. मोफत घरपोच सेवा + १० टक्के सूट यासाठी संपर्क क्र. ८६००७४१११०/७५१११० /७६१११०. 'COD उपलब्ध' * अटी लागू

# पुणे-पिंपरी अजून 'वेटिंग'वरच

## केंद्राकडून शंभर शहरांची यादीही 'होल्ड'वर

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेत पुणे आणि पिंपरी-चिंचवड स्वतंत्र असणार, की संयुक्तच राहणार, याचा निर्णय अद्याप 'वेटिंग'वरच आहे. गेल्या आठवड्यात जाहीर होणारी शंभर शहरांची यादी केंद्राने अद्याप रोखून ठेवली असून, त्याबाबत लवकर निर्णय व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्मार्ट सिटीत पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा संयुक्त प्रस्ताव राज्याने केंद्र सरकारकडे पाठविला. त्यावरून, सर्वदूर टीकेची झोड उठत असतानाच, त्याबाबत निर्णय घेण्याच्या सूचना केंद्र सरकारने राज्य सरकारला दिल्या होत्या. पुणे-पिंपरीचा संयुक्त प्रकल्प असला, तरी दोन्ही शहरांना निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच दिली होती. या पार्श्वभूमीवर, पुणे-पिंपरीचा संयुक्त प्रस्ताव मान्य करतानाच, दोन्ही शहरांना स्वतंत्र निधी द्यावा, अशी मागणी राज्य सरकारने केंद्राकडे केली असल्याचे कळते. केंद्राने स्मार्ट सिटीसाठी निश्चित केलेल्या धोरणापलीकडे त्याबाबत निर्णय घ्यावा लागणार असल्याने केंद्रीय नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू यांच्या मंजुरीसाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. संसदेचे अधिवेशन गुरुवारपर्यंत चालणार असून, संसदीय कार्यमंत्री नायडू यांना त्यानंतरच त्यावर निर्णय घेणे शक्य होणार आहे. राज्य सरकारने पुणे-पिंपरीचा संयुक्त प्रस्ताव केंद्राकडे पाठविला. त्यावरून, सर्व राजकीय पक्षांकडून सरकारला धारेवर धरले जात असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र पुणे-पिंपरीला न्याय देण्यासाठीच संयुक्त प्रस्ताव पाठविण्याचे समर्थन केले होते.



### सर्व पक्षांचे सरकारवर टीकास्त्र

मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवर काँग्रेस-राष्ट्रवादी आणि मनसेसह मित्रपक्ष शिवसेनेने टीकास्त्र सोडले आहे. मात्र, राज्याने आता पुन्हा चेंडू केंद्र सरकारच्या कोर्टात टोलवला असून, केंद्रीय मंत्र्यांवर पुणे-पिंपरीच्या स्मार्ट सिटीतील समावेशाचा निर्णय अवलंबून असेल.

## स्पर्धेतील दहा सूचनांची निवड

**पुणे :** महापालिकेने स्मार्ट सिटी बाबत घेतलेल्या स्पर्धेतील उत्कृष्ट दहा सूचनांची निवड महापालिका प्रशासनाने केली आहे. यापैकी पाच जणांना त्यांच्या सूचनांचे सादरीकरण करण्याची संधी देण्यात येणार असून त्यातून निवडण्यात आलेल्या सूचनांचा समवेश स्मार्ट सिटी योजनेमध्ये केला जाणार आहे.

शहराचा समावेश केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेमध्ये होत असताना कोणत्या कामांना प्राधान्य द्यावे, कोणती विकास कामे केली जावीत, यासाठी महापालिकेने नागरिकांकडून मते मागविली होती. यासाठी पालिकेने 'माझं स्वप्न स्मार्ट सिटी' ही ऑनलाइन स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेत साडेसहा हजार नागरिकांनी आपल्या सूचना पाठविल्या होत्या. यातील ३० सूचनांची निवड करून पालिकेने पुन्हा त्यावर ऑनलाइन मतदान घेतले. त्यातील दहा सूचनांची निवड पालिकेने केली आहे. उपेंद्र सरवैय्या, चैताली कुलकर्णी, शाहुराज कदम, वरद कुलकर्णी, शिखा जैन, मिलिंद आचार्य, अर्चित चावरे, नवनाथ राऊत, प्रशांत सहाय, गौरव शिंदोळकर यांच्या सूचनांची निवड प्रशासनाने केली आहे.

या दहा सूचनांपैकी पाच जणांना सविस्तर सादरीकरण करण्याची संधी महापालिकेच्या वतीने दिली जाणार असून त्यातील तीन सूचनांना पालिकेच्या वतीने पुरस्कार दिले जाणार आहेत. महापौर दत्तात्रय धनकवडे यांच्या हस्ते १५ ऑगस्टला हे पुरस्कार दिले जाणार आहेत. स्मार्ट सिटी होण्यासाठी शहरातील सार्वजनिक वाहतुकीचा प्रश्न सोडवावा, पीएमपीएमएलचे मोबाइल ॲप तयार करावे, लग्न, पार्टी, हॉटेल्स यामधून दररोज मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. या अन्नासाठी पालिकेने २४ तास हेल्पलाइन सुरू करावी. पार्किंग व्यवस्था सक्षम करावी, घनकचरा व्यवस्थापन, सुरक्षा ॲप तयार करावे, अशा अनेक सूचना यामध्ये करण्यात आल्या आहेत.

# वाद टाळण्यासाठीच 'बारामतीकर' अनुत्सुक

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्यातील दुष्काळी स्थितीच्या काळात भपकेबाज संमेलन आयोजित करून वाद ओढवू नये, यासाठी बारामतीकरांनी संमेलनाच्या आयोजनासाठी फार आग्रह धरला नाही, असे सांगण्यात येत आहे. तसेच, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात संमेलन घेऊ नये, असा विचार पुढे आल्याने 'बारामतीकरां'कडून संमेलनाच्या संयोजनाचा विचार सोडून देण्यात आल्याचे समजते.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या बारामती शाखनेही साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठीचे निमंत्रण अखिल भारतीय साहित्य महामंडळाला दिले होते. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य या निमंत्रणामागे होते. त्यामुळे हे संमेलन बारामतीमध्येच होणार असल्याची चर्चाही साहित्य वर्तुळात सुरू झाली होती. प्रत्यक्षात, पवार यांच्याकडूनच साहित्य महामंडळाला साहित्य संमेलन बारामतीला न घेण्याचे संकेत देण्यात आले.

राज्याच्या विविध भागांमध्ये यंदा भीषण दुष्काळाची स्थिती उद्भवली आहे. विशेषत: मराठवाड्यासारख्या भागात ही समस्या अधिक तीव्र आहे.

अशा काळात ग्रामीण भागात संमेलन घेऊन त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करणे योग्य ठरणार नाही, असा विचार ज्येष्ठ नेत्यांनी केल्याचे समजते. तसेच ग्रामीण भागात असे संमेलन आयोजित केले; तर पुन्हा वाद उद्भवण्याची शक्यताही वर्तविण्यात येत होती. या परिस्थितीचा विचार करून बारामतीकरांनी संमेलनाच्या आयोजनासाठी फार आग्रह धरला नाही, असे समजते.

### श्रीगोंद्याच्या आड राजकीय वाद

लेखक राजन खान यांच्या अक्षरमानव संघटनेच्या वतीने श्रीगोंदा येथे संमेलन आयोजित करण्याचे निमंत्रण देण्यात आले होते. श्रीगोंदा येथे संमेलन घेण्यासाठी माजी आमदार बबनराव पाचपुते मदत करणार होते. मात्र, गेल्या काही काळात त्यांच्यासंदर्भात काही राजकीय वाद पुढे आले होते; तसेच त्यांनीही संमेलनाच्या आयोजनासाठी फारसा उत्साह न दाखवल्याने श्रीगोंद्याचा मान हुकला.

राहुल देशमुख



**पुणे महापालिकेचा घनकचरा व्यवस्थापन विभाग, कमिन्स इंडिया, एनसीएल आणि मॉज इंजिनीअरिंग सिस्टिम्सतर्फे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती विसर्जनासाठी पर्यावरणपूरक पद्धत विकसित करण्यात आल्यानंतर त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.**

# पर्यावरणपूरक विसर्जन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती पाण्यात विरघळविण्यासाठी पुण्यातील शास्त्रज्ञांनी पर्यावरणपूरक पद्धत विकसित केली आहे. विसर्जनावेळी गणेशमूर्तींच्या जलाभिषेकासाठी खाण्याच्या सोड्याचे पाणी वापरले, तर गणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक विघटन करणे शक्य असल्याचे या पद्धतीने दाखवून दिले आहे. गणेशभक्तांच्या भावना न दुखावता हे शक्य झाल्याने, गणेश मंडळांकडूनही या पद्धतीचे कौतुक केले जात आहे.

पुणे महापालिकेचा घनकचरा व्यवस्थापन विभाग, कमिन्स इंडिया, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) आणि मॉज इंजिनीअरिंग सिस्टिम्सच्या एकत्रित प्रयत्नांमधून ही पद्धत विकसित करण्यात आली आहे. ही पद्धत वापरण्यासाठी तयार करण्यात आलेल्या यंत्राचे सोमवारी पुण्यातील गणेशमंडळांसाठी एक प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. त्या निमित्ताने मॉज इंजिनीअरिंग सिस्टिम्सचे संशोधक आणि 'एनसीएल'मधील निवृत्त वैज्ञानिक डॉ. मोहन डोंगरे यांनी या पद्धतीची 'मटा'ला माहिती दिली. गेल्या तीन वर्षांपासून महापालिका आणि 'कमिन्स' अशा उपक्रमासाठी प्रयत्नशील होती. प्लास्टर ऑफ पॅरिसशी (पीओपी) संबंधित रासायनिक अभिक्रियांची माहिती 'एनसीएल'ने दिली. त्यासाठी डॉ. शुभांगी उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'एनसीएल'मधील संशोधकांनी संशोधन केले. तर 'मॉज'ने ही पद्धत वापरण्यासाठीची यंत्रणा विकसित केल्याचे डॉ. डोंगरे यांनी नमूद केले.

**प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीसाठी प्रयत्न**

या पद्धतीमध्ये खाण्याच्या सोड्याचे द्रावण विशिष्ट गतीने गणेशमूर्तींवर सोडले जाते. खाण्याचा सोडा आणि 'पीओपी'मध्ये होणाऱ्या रासायनिक अभिक्रियेमुळे हळूहळू मूर्ती विरघळते. त्यासाठी तयार केलेल्या यंत्रामध्ये ५ किलोग्रॅम वजनाची आणि दीड फूट उंचीची मूर्ती दोन तासांमध्ये पूर्णपणे विरघळविणे शक्य झाल्याचेही डोंगरे यांनी सांगितले. सध्या या यंत्रणेमध्ये मूर्तींवर सोड्याचे द्रावण सोडण्यासाठी बसविलेले जेट आणि गणेशमूर्ती ठेवण्यासाठी शंभर लिटर क्षमतेची टाकी यांचा समावेश आहे. या पुढील टप्प्यात ही यंत्रणा विकसित करण्यासाठीही सर्व सहभागी लोक प्रयत्नशील असल्याचे डोंगरे यांनी सांगितले.

### अशी विरघळते गणेशमूर्ती

प्लास्टर ऑफ पॅरिस म्हणजे कॅल्शियम सल्फेटमुळे होणारे जलप्रदूषण ही चिंतेची बाब आहे. त्यामुळेच ते विरघळविण्यासाठी ही पद्धत वापरण्यात आली. बेकिंग सोड्याच्या (अमोनियम कार्बोनेट) पाण्याशी कॅल्शियम सल्फेटची अभिक्रिया झाली; तर कॅल्शियम कार्बोनेट आणि अमोनियम सल्फेट तयार होते. कॅल्शियम कार्बोनेट सिमेंटचे ब्लॉक बनविण्यासाठी उपयुक्त ठरते; तर अमोनियम सल्फेट हे पाण्यात विरघळणारे असून, ते खत म्हणूनही वापरता येते. खाण्याच्या सोड्याचे द्रावण हे तुलनेने कमी तीव्रतेचे आहे; तर या प्रक्रियेतून तयार होणाऱ्या दोन्ही बाबी पुन्हा वापरणे शक्य आहे. त्यामुळेच ही पद्धत पूर्णपणे पर्यावरणपूरक असल्याचेही डॉ. डोंगरे यांनी स्पष्ट केले.

## पंधरा हजार रिक्षांचे कॅलिब्रेशन नाहीच

**पुणे :** नवीन भाडेवाढीनुसार रिक्षा मीटरचे कॅलिब्रेशन करण्यासाठी निश्चित केलेली अंतिम मुदत संपण्यास केवळ चार दिवस उरले असून, १५ हजार रिक्षांच्या मीटरचे कॅलिब्रेशन करण्याचे आव्हान वैधमापन विभागापुढे आहे. आतापर्यंत ३० हजार रिक्षांचे मीटर कॅलिब्रेशन करण्यात आले आहे. कॅलिब्रेशनकरीता १४ ऑगस्ट ही अंतिम मुदत आहे.

पुणे शहरात आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एक जुलैपासून रिक्षा भाडेवाढ लागू करण्यात आली आहे. नवीन दराने रिक्षाभाडे आकारण्यापूर्वी मीटर कॅलिब्रेशन करणे बंधनकारक आहे. शहरातील एकूण ४५ हजार रिक्षांपैकी आतापर्यंत ३० हजार रिक्षांचे कॅलिब्रेशन झाले आहे, अशी माहिती वैध मापन विभागाचे अधिकारी जी. एल. कोवे यांनी दिली. आरटीओकडील माहितीनुसार शहरात ४५ हजार रिक्षा आहेत. मात्र, त्यातील प्रत्यक्षात रस्त्यावर धावणाऱ्या म्हणजेच चालू अवस्थेतील रिक्षा किती याचा खरा आकडा माहिती नाही. गेल्यावेळी भाडेवाढीनंतर किती रिक्षांचे कॅलिब्रेशन करण्यात आले होते. त्याची माहिती आरटीओकडे मागितली आहे.

# दहा टीएमसी पाणी कमी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल १० टीएमसी पाणी कमी असल्याने भविष्यकाळात पाऊस न पडल्यास उपलब्ध पाण्याचे नियोजन कसे करायचे, असा प्रश्न पालिका प्रशासनासमोर पडला आहे. धरणात उपलब्ध असलेला पाणीसाठा लक्षात घेता ऑगस्ट महिन्याचा पहिला आठवडा उलटल्यानंतरही पाण्याच्या नियोजनाबाबत जलसंपदा विभागाकडून कोणत्या सूचना अद्यापही पालिकेला देण्यात न आल्याने पालिकेकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पुण्यासह राज्यातील विविध भागांत पावसाने चांगलीच ओढ दिली आहे. परिणामी, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा हळूहळू कमी होत चालला आहे. धरण क्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात होत असलेल्या पावसामुळे काही टक्के पाणी धरणात जमा होत असले तरी गेल्या वर्षी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात धरणांमध्ये असलेला पाणीसाठा लक्षात घेता, यंदाच्या वर्षी तब्बल १० टीएमसी पाणी कमी आहे. मागच्या वर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शहराला पाणीपुरवठा करणारी चारही धरणे ८० टक्के भरली होती. या चारही धरणांमध्ये २५ टीएमसी पाणी शिल्लक होते. मात्र, यंदाच्या वर्षी या सर्व धरणांमध्ये अवघे १५ टीएमसी पाणी आहे.

**पाण्याच्या नियोजनाबाबत महापालिकेपुढे प्रश्न**

पुढील काही दिवसांमध्ये धरण क्षेत्रात पुरेसा पाऊस न पडल्यास पाणीसाठा कमी होणार आहे. अशा परिस्थितीमध्ये अचानक जलसंपदा विभागाने पालिकेला तातडीने मोठ्या प्रमाणात पाणीकपात करण्याच्या सूचना दिल्यास आयत्यावेळी त्याचे नियोजन नक्की कसे करायचे, असा प्रश्न पालिका प्रशासनासमोर पडला आहे.

जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांबरोबरच पालिकेने अनेकदा चर्चा केली मात्र काळजी करू नका पाऊस पडणार आहे, असे उत्तर जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांकडून दिले जात असल्याने धरणात पाणी कमी असतानाही पालिकेला कपात करता येत नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### धरण क्षेत्रात गेल्या २४ तासांत पडलेला पाऊस

| धरण | पडलेला पाऊस (मिमी) |
| --- | --- |
| खडकवासला | ०१ |
| पानशेत | ०७ |
| वरसगाव | ०७ |
| टेमघर | ०४ |



# पालिकेचे १६ कर्मचारी जाळ्यात

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

गेल्या तीन वर्षांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे महापालिकेत करण्यात आलेल्या कारवाईमध्ये १७ कर्मचारी सापडले असून, त्यातील दोषारोप सिद्ध झालेल्या एका कर्मचाऱ्याला तातडीने पालिका सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. इतर कर्मचाऱ्यांवरील कायदेशीर प्रक्रिया अद्याप सुरू असल्याचे स्पष्टीकरण पालिकेने दिले आहे.

महापालिकेतील कामांसाठी नागरिकांकडून पैशांची मागणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यानंतर रचलेल्या सापळ्यात पालिकेतील १७ अधिकारी-कर्मचारी सापडले आहेत. गेल्यावर्षी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत पालिकेतील केवळ दोनच अधिकारी-कर्मचारी सापडले होते; पण २०१३ मध्ये पालिकेच्या तब्बल १० अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती. यंदा आतापर्यंत पाच अधिकारी-कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत सापडलेल्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाई केली जात असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे त्यांच्यावर कोर्टात खटला दाखल केला जातो. गेल्या तीन वर्षांत एका अधिकाऱ्याची निर्दोष मुक्तता झाली असून, लाच घेतल्याचे सिद्ध झालेल्या एका अधिकाऱ्याला नुकतेच सेवेतून बडतर्फे केले गेले आहे, अशी माहिती उपायुक्त मंगेश जोशी यांनी दिली.

### तीन हजारांची लाच नोकरीवर बेतली

भवानी पेठेतील क्षेत्रीय कार्यालयात काम करणाऱ्या खंडू श्रीरंग शेलार या पालिकेच्या कर्मचाऱ्याला गेल्यावर्षी जानेवारीत तीन हजार रुपयांची लाच घेताना पकडण्यात आले. या कर्मचाऱ्याला नुकतीच कोर्टाने दंड आणि कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. कोर्टाने शिक्षा सुनावताच पालिकेने त्याला नोकरीतून काढून टाकले आहे. त्यामुळे, तीन हजारांची लाच घेणे शेलार यांना महाग पडले असून, नोकरी गमावण्याची वेळ आली आहे.

### गेल्या तीन वर्षांतील कारवाई



- वर्ग १ - १
- वर्ग २ - ५
- वर्ग ३ - ४
- वर्ग ३ - ६

## सॉफ्टवेअर इंजिनीअरचा खून

(पान १ वरून)

उत्तमने दोन ऑगस्ट रोजी मोहनला मद्यपानासाठी बोलावले होते. उत्तम आणि त्याचा साथीदार विशाल याने मोहनला पिरंगूट येथे नेले. तेथे घाटात मोहन लघुशंकेसाठी उतरला असताना त्याच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केला आणि त्याच्या खिशातील ऐवज काढून दोघांनी पळ काढला. दरम्यान, पौड पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला होता.

आरोपींनी मोहनच्या एटीएम कार्डद्वारे पुणे, पिंपरी, शिर्डी अशा विविध ठिकाणी अडीच लाख रुपयांची खरेदी केली. खरेदी केलेल्या ठिकाणच्या 'सीसीटीव्ही' फुटेजद्वारे आरोपींची प्रतिमा मिळवण्यात आली होती.

येरवडा पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्यात उत्तमकडे तपास सुरू होता. उत्तम हा गुन्हेगार असून, रिक्षा चालक असल्याचे समजल्यावर मोहनबाबत तपास करण्यात आला. या वेळी त्याने मोहनच्या खुनाची कबुली दिली, असे पाटील यांनी सांगितले.

# पोलिसाचा अपहरणाचा डाव उधळला

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

संशयास्पद कारचा पाठलाग करत ती अडवणाऱ्या वाहतूक पोलिस कर्मचाऱ्याचेच अपहरण केल्याचा प्रकार नवले पुलाजवळ सोमवारी सकाळी घडला. या प्रकरणी मुंबई येथील दोघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध सिंहगड रोड पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशांत विभाकर पिराळे (वय ४८) आणि दीपक सूर्यकांत मैंदर्गे (४८, रा. दोघेही सोनी अपार्टमेंट, जरी-मरी कुर्ला अंधेरी रोड, कुर्ला (वेस्ट), मुंबई) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी वाहतूक पोलिस कर्मचारी मयूर मंडले (२९) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

मंडले हे वडगाव पुलाजवळ नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करत होते. या वेळी त्यांना एक लाल रंगाची संशयित इको मारुती कार भरधाव वेगाने जात असल्याचे दिसले. त्यांनी कार चालकाला थांबण्यास सांगितले. मात्र, चालकाने तेथून पळ काढला. कारमध्ये बॅगा भरलेल्या दिसल्याने मंडले यांना संशय आला आणि पाठलाग केला. नवले पुलाजवळ वाहतूक असल्याने कारचा वेग मंदावला होता. मंडले यांनी कारचालकाकडे वाहन परवान्याची मागणी केली होती. मात्र, कारचालकाने परवाना नसल्याचे सांगितले. वाहतूक सुरळीत होताच कारचालकाने पुलाखालून वळून मुंबईच्या दिशेने आपला वेग वाढवला.

मंडले यांनी एका दुचाकीस्वाराच्या मदतीने कारचा पाठलाग केला. मुठा नदीवरील पुलावर दुचाकी आडवी लावून कार थांबवण्यात आली. मंडले हे कारमध्ये बसले आणि चालकाला कार नजीकच्या पोलिस चौकीला घेण्यास सांगितले. त्याचवेळी आरोपींनी, 'आम्ही कोण आहोत, ते तुला मुंबई येथे नेऊन दाखवतो,' असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच, कार सुरू करून मुंबईच्या दिशेने कार सुरू केली.

मंडले यांनी तत्काळ आपल्या मोबाइलवरून पोलिस नियंत्रण कक्षाला फोन केला आणि घटनेची माहिती दिली. कार चांदणी चौकाजवळ आली असता तेथे वाहतूक पोलिसांकडून नियमन सुरू होते. मंडले यांनी कारमधून जोरजोरात ओरडून नियमन करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना आपले अपहरण करण्यात येत असल्याचे सांगितले. फौजदार शिवराज कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कार थांबवून मंडले यांची सुटका केली. कारमधील दोघांनाही ताब्यात घेत सिंहगड पोलिस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.




**आरोपींनी वाहतूक पोलिसाचे याच कारमधून अपहरण केले होते.**

## कारच्या धडकेत वकिलाचा मृत्यू

**पुणे :** केळकर रोडवरून नदीपात्रातील भिडे पुलाकडे जाताना स्कॉर्पिओच्या धडकेत वकील मृत्युमुखी पडल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. स्कॉर्पिओचालक हा मद्याच्या अंमलाखाली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी चालकाला अटक केली आहे.

नितीन गोपाळ ठोंबरे (वय २८, रा. गौरव बिर्याणी हाऊस जवळ, शुक्रवार पेठ, पुणे) असे मृत्युमुखी पडलेल्या वकिलाचे नाव आहे. या प्रकरणी प्रत्यक्षदर्शी बाबा रामचंद्र मोरे (वय २६, रा. अमृतेश सोसायटी, नारायण पेठ, पुणे) यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी विकास रामचंद्र सातव (वय ४४, रा. तारांकीत अपार्टमेंट, नवी सदाशिव पेठ, पुणे) या स्कॉर्पिओ चालकाला अटक केली आहे. ठोंबरे नदीपात्रातून दुचाकीवरून जात होते. यावेळी मद्यधुंद अवस्थेत असलेल्या स्कॉर्पिओचालक सातव याने ठोंबरे यांना जोराची धडक दिली. यात ठोंबरे यांचा मृत्यू झाला.

# गोकावेंकडे ७४ लाखांची मालमत्ता; गुन्हा दाखल

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**


**नितीन गोकावे**

कोल्हापूर येथे सध्या; तर पुणे ग्रामीण पोलिस दलातील तत्कालीन पोलिस निरीक्षक नितीन गोकावे आणि त्यांच्या कुटुंबीयांविरोधात ७४ लाख रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जमविल्याप्रकरणी वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी सकाळी गुन्हा दाखल केल्यानंतर पुणे, सातारा आणि सांगलीतील घरावर छापे घातले.

गोकावे यांच्यासह त्यांच्या पत्नी जयश्री उर्फ नेहा नितीन गोकावे, अनुराधा नितीन गोकावे, वडील निळकंठ रामचंद्र गोकावे आणि आई लता निळकंठ गोकावे (सर्व जण रा. ऐ-२४, आदित्य गार्डन सिटी, वारजे माळवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले आहे. गोकावे कुटुंबीय हे मूळचे मिरज (सांगली) येथील आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागात आलेल्या तक्रारीनंतर त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात आली. त्यांनी १९९३ ते २०१४ या काळात ७४ लाख ४१ हजार रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जमवल्याचे चौकशीदरम्यान निष्पन्न झाले आहे. त्यांच्या एकूण मालमत्तेमध्ये २९.०६ टक्के मालमत्ता ही बेहिशोबी आढळली आहे, अशी माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिली.

गोकावे यांच्या पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर येथील स्थावर व जंगम मालमत्तेच्या अनुषंगाने झडती घेण्यात आली. जवळपास ६० लाख रुपयांच्या मालमत्तेचे पंचनामे करण्यात आले आहे. बँकांना पत्र देत गोकावे यांचे लॉकर तपासल्याची माहिती अप्पर अधीक्षक अर्जुन सकुंडे यांनी दिली.